दैनिक
# दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र
एकूण पाने : १२+४+८=२४ । किंमत ₹ ४.०० | वर्ष ८ । अंक ३६ । महानगर
औरंगाबाद मंगळवार, 3 जुलै २०१८

# चिकाटीने अभ्यास करा यश मिळेल : आ. धस

प्रतिनिधी | कडा

चित्रपटाचं जग आणि खरं आयुष्य यात खूप फरक असतो. याची गल्लत न करता मन लावून , चिकाटीने अभ्यास करा तुम्हाला नक्कीच यश मिळेल असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले.

कडा येथील अमोलक शिक्षण संस्थेच्यावतीने दहावी , बारावी सह विविध विद्या शाखेतील गुणवंत विद्यार्थी आणिं तालुक्यातील स्पर्धा परीक्षेत यश मिळवणाऱ्या युवकांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ धस बोलत होते. ते म्हणाले की शालेय जीवनात मिळालेले शिक्षण हे खरे शिक्षण असते . शिक्षणासाठी वयाचे बंधन नसते हे खरे असले तरी शालेय शिक्षणामुळेच आयुष्याला दिशा मिळते. छोटा भीम किंवा चित्रपटातील झगमगाट म्हणजे खरे आयुष्य नसते . प्रामाणिकपणे , चिकाटीने अभ्यास करा यश नक्की मिळेलच असे सांगितले. त्याचबरोबर अमोलक मध्ये इ लायब्ररी तयार करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले . आ धस यांच्या हस्ते अमोलक मधील दहावी , बारावी , फार्मसी परीक्षेत यश मिळवणारे विद्यार्थी आणि आष्टी तालुक्यातील रहिवाशी असणाऱ्या स्पर्धा परीक्षेतील यशस्वी उमेदवारांचा सत्कार करण्यात आला .अमोलक शिक्षण संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या विविध कार्याची माहिती दिली.

त्याचबरोबर अमोलक शिक्षण संस्था आगामी काळात स्पर्धा परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी स्वतंत्र युनिट सुरू करणार असल्याचे सांगितले. यावेळी पोलीस उपअधीक्षक मंदार नाईक तसेच स्पर्धा परीक्षेत यश मिळवणारे सुधीर केकान , मंगेश नागरगोजे , केतकी जगताप , खोमणे, दिलीप थोरवे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर निवासी नायब तहसीलदार प्रदीप पांडुळे , गोकुळदास मेहेर , पोपटलाल भळगट , कांतीलाल चानोदिया , अनिल ढोबळे , रमजान तांबोळी उपस्थित होते.

बीडचा
# लोकप्रश्न
epaper : www.lokprashna.com
मंगळवार दि.३ जुलै २०१८
Reg.No.L / Beed/21/2017-2019 RNI Reg. No.MAHMA

LIBRARY

## जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास ठेवल्यास यशप्राप्ती निश्चित–आ.सुरेश धस

कडा । वार्ताहर

ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील गुणवत्तेत आता मागे नाहीत हे गेल्या काही दिवसातील निकालावरून स्पष्ट होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवत प्रशासनामध्ये अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करून अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे. तसेच सुसंस्कृत नागरिक घडविण्याची जबाबदारी ही शिक्षकावर असून दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी देखील जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास बाळगुन यश संपादन करावे असे मत नवनिर्वाचित आमदार सुरेश धस यांनी केले.



### अमोलकमध्ये विध्यार्थ्यांचा गुणगौरव

कडा येथील श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाच्या विद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व सत्कार प्रसंगी ते बोलत होते

पान २ वर ▶▶

### जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास

यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसिलदार प्रदीप पांडुळे, डीवायएसपी मंदार नाईक, सरपंच अनिल ढोबळे, सभापती रमजान तांबोळी, शिवराज पाटील, युवराज पाटील, संस्थेचे अध्यक्ष गोकुळदास मेहेर, सचिव हेमंत पोखरणा, आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी इयत्ता दहावी, बारावी, तसेच शिष्यवृत्ती शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या विविध विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव व सत्कार करण्यात आला.यावेळी धस यांच्या हस्ते शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. आ.सुरेश धस म्हणाले, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर जीवनात यशप्राप्ती मिळते आज मला सर्व विद्यार्थ्यांचा गुणगौरव करताना आनंद होत आहे यामधून भविष्याची पिढी नक्कीच उज्वल घडणार असल्याचे त्यांनी सांगितले .अमोलक शिक्षण संस्था ही खूप जुन्या काळापासून [illegible] आहे त्यासाठी प्रत्येक पालकाने मुलीलाही मुलाइतकेच शिक्षण देण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले या विद्यालयांमध्ये सुसज्ज असे ग्रंथालय देणार असून त्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली.

प्रास्ताविकात संस्था सचिव हेमंत पोखरणा यांनी सांगितले की ,अमोलक विद्या प्रसारक मंडळाने गेल्या अनेक वर्षापासूनची उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे .या संस्थेने अनेक गुणवंत विद्यार्थी घडविले आहेत .१९२४ साली स्थापन झालेल्या या संस्थेने शेकडो विद्यार्थी प्रशासकीय सेवेत काम करत आहेत यावर्षीपासून स्पर्धा परीक्षा केंद्र सुरु करणार असून यापुढे जास्तीत जास्त जास्त विध्यार्थी कसे घडतील यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी

# महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीत प्राचीन कालखंडाचे मोठे योगदान - डॉ.प्रभाकर देव

कडा। वार्ताहर

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीत प्राचीन कालखंडाचे योगदान मोठे लक्षणीय ठरलेले आहे. प्राचीन कालखंड हा अतिशय संपन्नतेचा होता. प्राचिनत्वाच्या अनेक पाऊलखुणा महाराष्ट्राच्या भूमीत आढळतात. मात्र दुर्दैवाने आपण या पाऊलखुणा म्हणजेच प्राचीनकाळ विसरलो असे प्रतिपादन अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या २७ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.प्रभाकर देव यांनी केले. कडा येथील श्रीमती एस.के.गांधी महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या अमोलक नगरी मध्ये आयोजित इतिहास परिषदेचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. इतिहास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.जयसिंगराव पवार, उदघाटक डॉ. अरुणचंद्र पाठक, परिषदेचे अध्यक्ष डॉ.टी. एस. पाटील, स्वागताध्यक्ष कांतीलालजी चाणोदिया, ट्रस्ट अध्यक्ष गोकुळदासजी मेहेर, कार्याध्यक्ष योगेश भंडारी, उपाध्यक्ष पोपटलालजी भंडारी, रमेशलालजी गुगळे, सेक्रेटरी हेमंत पोखरणा, कोषाध्यक्ष अनिल झाडमुथ्था, मानदमंत्री विनोद बलदोटा, बिपीन भंडारी, गांधी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ.उमेश गांधी, माजी कुलगिरी डॉ.सर्जेराव निमसे, डॉ.अशोक कामत, डॉ.आर.एस.मोरवंचिकार, पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड, प्राचार्य डॉ जी. पी.ढाकणे, प्राचार्य डॉ.हरिदास विधाते, प्राचार्य डॉ.एस.एस.पाताळे, परिषदेचे स्थानिक सचिव प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी, प्रा.एन.एन.विधाते, कार्यवाह डॉ.चंद्रकांत चव्हाण, उपकार्यवाह डॉ.नलिनी वाघमारे, खजिनदार डॉ.प्रशांत कोठे, कार्यकारीणी सदस्य डॉ.अशोक कानडे, डॉ.जाकीर पठाण, डॉ.सतीश कदम, डॉ.दिनेश महाजन, डॉ.शिवराज बोकडे, रमेश चंदनकर, निमंत्रित सदस्य डॉ.विकास कदम, डॉ.नामदेव हटवार, रवींद्र लाड, डॉ.कविता तांतेड आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलतांना डॉ.देव म्हणाले की, आपण प्राचीनकाळ विसारल्यामुळे महाराष्ट्राची कला आविष्कार परंपरा विस्मृतीत गेली, आणि महाराष्ट्राला आम्ही दगडांचा देश म्हणून गौरवितो. खरे तर कलाकारांचा प्रदेश म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. उदघाटक अरुणचंद्र पाठक म्हणाले की, कोणत्याही मानवी इतिहासाचा प्रमुख घटक ही मानवी संस्कृती असते आणि संस्कृतीला स्वतःचा आत्मा व तात्विक अधिष्ठान असते. संस्कृती ही सतत उत्क्रांत पावणांऱ्या जैविक घटकाप्रमाणे असते तर मानवी सभ्यता ही विविध संस्कृतीच्या समन्वयातून निर्माण होणारी सहजीवी अस्तित्व असते. प्रत्येक संस्कृतीला स्वतःच्या व्यक्तीत्वावर आणि आपल्या क्षमतेवर ठाम राहावे लागते. त्या त्या संस्कृती मध्ये निर्माण होणारे साहित्य, नेतृत्व आणि त्याला मिळणार प्रतिसाद यावर संस्कृती आणि सभ्यतेची दिशा ठरते.

डॉ.जयसिंगराव पवार म्हणाले की, महाराष्ट्र इतिहास परिषद ही केवळ इतिहासाच्या प्राध्यापकांची नसून सर्वस्तरातील लोकांची व इतिहास प्रेमींची संस्था आहे. इतिहास परिषदेत वाचलेले शोधनिबंध प्रकाशित करण्याचे काम परिषद करते. महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या व्यासपीठावरुन गेल्या २६ वर्षात सुमारे १० हजार शोधनिबंध वाचले गेले आणि संशोधकांची एक पिढी घडली हे या परिषदेचे सर्वात मोठे फलित आहे. यावेळी संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा, इतिहास परिषदेचे अध्यक्ष टी. एस.पाटील यांचीही भाषणे झाली. यावेळी माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांना इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार, प्रा.डॉ.अशोक कामत यांना पंडित सेतू माधवराव पगडी पुरस्कार, तर डॉ.आर.एस.मोरवंचिकर यांना इतिहास भूषण वा. सी.बेंद्रे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते 'संशोधन पत्रिका', डॉ.राधाकृष्ण जोशी यांच्या 'हिस्ट्री ऑफ मॉडर्न महाराष्ट्र', डॉ.प्रशांत कोठे यांच्या 'वऱ्हाडतील नागपूरकर भोसल्यांनी कामगिरी' प्रा.प्रफुल्ल टाले यांच्या 'आधुनिक महाराष्ट्रातील सुधारणा चळवळीचा इतिहास' इत्यादी पुस्तकांचे प्रकाशन झाले. उदघाटन समारंभपूर्वी संस्था कार्यालय ते अमोलक नगरी या कार्यक्रम स्थळापर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात आली होती. या ग्रंथ दिंडीमध्ये फुलांनी सजविलेल्या पालखी मध्ये धार्मिक




व ऐतिहासिक ग्रंथ ठेवण्यात आले होते. अब्दागिरी, टाळ, मृदुंग, विणा, हाती घेतलेले वारकरी तसेच एन.सी.सी.चे विद्यार्थी-विद्यार्थिनी, मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक सहभागी झाले होते. मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शन, शिवकालीन शस्त्र प्रदर्शन, पुरातत्वीय वस्तू प्रदर्शन, किल्ले प्रदर्शनाचे उदघाटन झाले. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व श्री अमोलक ऋषींच्या प्रतिमेचे पूजन करून इतिहास परिषदेचे उदघाटन झाले. शाहीर भारत गाडेकर व सहकाऱ्यांनी गायिलेल्या महाराष्ट्र गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. स्थानिक सचिव प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी यांनी इतिहास परिषदेच्या आयोजनामागील भूमिका मांडली प्रा.डॉ.एस.एस.पाताळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी इतिहास परिषदेच्या अहवालाचे वाचन केले. डॉ.योगेश रसाळ व प्रा.धनश्री मुनोत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.एन.एन. विधाते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.जमीर सय्यद, प्रा.तुकाराम गोंदकर, प्रा.युनूस सय्यद,प्रा, सतीश कटारिया,

बीड-महाराष्ट्र
# झुंजार नेता
• दिनांक : १ डिसेंबर २०१८ • वार : शनिवार • पान ३

# महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीत प्राचीन कालखंडाचे मोठे योगदान - डॉ. प्रभाकर देव

कडा दि.३० (प्रतिनिधी):- महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वाटचालीत प्राचीन कालखंडाचे योगदान मोठे लक्षणीय ठरलेले आहे. प्राचीन कालीखंड हा अतिशय संपन्नतेचा होता. प्राचिनत्वाच्या अनेक पाऊलखुणा महाराष्ट्राच्या भूमीत आढळतात. मात्र दुर्दैवाने आपण या पाऊलखुणा म्हणजेच प्राचीनकाळ विसरलो असे प्रतिपादन अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेच्या २७ व्या राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ.प्रभाकर देव यांनी केले.



कडा येथील गांधी महाविद्यालयात आयोजित इतिहास परिषदेचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. इतिहास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.जयसिंगराव पवार, उदघाटक डॉ. अरुणचंद्र पाठक, परिषदेचे अध्यक्ष डॉ.टी. एस. पाटील, स्वागताध्यक्ष कांतीलल चाणोदिया, स्ट अध्यक्ष गोकुळदास मेहेर, कार्यध्यक्ष योगेश भंडारी, उपाध्यक्ष पोपटलाल भंडारी, रमेशलाल गुगळे, सेक्रेटरी हेमंत पोखरणा, कोषाध्यक्ष अनिल झाडमुथ्था, विनोद बलदोटा, बिपीन भंडारी, समन्वयक डॉ.उमेश गांधी, माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे, डॉ.अशोक कामत, डॉ.आर.एस.मोरवंचिकार, अभय आव्हाड, प्राचार्य डॉ जी. पी.ढाकणे, प्राचार्य डॉ.हरिदास विधाते, प्राचार्य डॉ.एस.एस.पाताळे, प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी, प्रा.एन.एन.विधाते, कार्यवाह डॉ. चंद्रकांत चव्हाण, डॉ.नलिनी वाघमारे, खजिनदार डॉ.प्रशांत कोठे, डॉ.अशोक कानडे, डॉ.जाकीर पठाण, डॉ.सतीश कदम, डॉ.दिनेश महाजन, डॉ.शिवराज बोकडे, रमेश चंदनकर, डॉ.विकास कदम, डॉ.नामदेव हटवार, रवींद्र लाड, डॉ.कविता तातेड आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ.जयसिंगराव पवार म्हणाले की, महाराष्ट्र इतिहास परिषद ही केवळ इतिहासाच्या प्राध्यापकांची नसून सर्वस्तरातील लोकांची व इतिहास प्रेमींची संस्था आहे. इतिहास परिषदेत वाचलेले शोधनिबंध प्रकाशित करण्याचे काम परिषद करते. यावेळी संस्थेचे सचिव हेमंत पोखरणा, इतिहास परिषदेचे अध्यक्ष टी. एस.पाटील यांचीही भाषणे झाली. यावेळी माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांना इतिहास संशोधक कै. आप्पासाहेब पवार पुरस्कार, प्रा. डॉ. अशोक कामत यांना पंडित सेतू माधवराव पगडी पुरस्कार, डॉ. आर. एस. मोरवंचिकर यांना इतिहास भूषण व सी.बेंद्रे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते 'संशोधन पत्रिका', डॉ.राधाकृष्ण जोशी यांच्या 'हिस्ट्री ऑफ मॉडर्न महाराष्ट्र', डॉ.प्रशांत कोठे यांच्या 'वऱ्हाडतील नागपूरकर भोसल्यांनी कामगिरी' प्रा.प्रफुल्ल टाले यांच्या 'आधुनिक महाराष्ट्रातील सुधारणा चळवळीचा इतिहास' इत्यादी पुस्तकांचे प्रकाशन झाले. उदघाटन समारंभपूर्वी संस्था कार्यालय ते अमोलक नगरी या कार्यक्रम स्थळापर्यंत ग्रांथ दिंडी काढण्यात आली होती. या ग्रांथ दिंडीमध्ये फुलांनी सजविलेल्या पालखी मध्ये धार्मिक व ऐतिहासिक ग्रांथ ठेवण्यात आले होते. अब्दागिरी, टाळ, मृदुंग, विणा, हाती घेतलेले वारकरी तसेच एन.सी.सी.चे विद्यार्थी-विद्यार्थिनी, मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक सहभागी झाले होते. मान्यवरांच्या हस्ते ग्रांथ प्रदशेन, शिवकालीन शस्र प्रदर्शन, पुरातत्वीय वस्तू प्रदर्शन, किल्ले प्रदर्शनाचे उदघाटन झाले. श्री अमोलक ऋषींच्या प्रतिमेचे पूजन करून इतिहास परिषदेचे उदघाटन झाले. शाहीर भारत गाडेकर व सहकाऱ्यांनी गायिलेल्या महाराष्ट गीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रा.डॉ.राधाकृष्ण जोशी यांनी इतिहास परिषदेच्या आयोजनामागील भूमिका मांडली प्रा.डॉ.एस.एस.पाताळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.चंद्रकांत चव्हाण यांनी इतिहास परिषदेच्या अहवालाचे वाचन केले. डॉ.योगेश रसाळ व प्रा.धनश्री मुनोत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.एन.एन. विधाते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.जमीर सय्यद, प्रा. तुकाराम गोंदकर, प्रा.युनूस सय्यद,प्रा. सतीश कटारिया, प्रा.सोमनाथ हासे, प्रा.किशोर चौधरी,प्रा. विठ्ठल पालवे, प्रा. नवनाथ विधाते, डॉ.अनिल गर्जे, डॉ.रमेश आब्दार, डॉ.मदन मार्कंडे, डॉ.सुनील पंढरे, डॉ.गोरक्ष शिंदे, प्रा.एस.डी. बोंबे, डॉ.विष्णू गव्हाणे, प्रा. संकेत गांधी, डॉ.चंद्रशेखर तळेकर, डॉ.अशोक कोरडे, डॉ.उद्धव चव्हाण आदींनी परिश्रम घेतले.